# तरुण भारत

सातारा

www.tarunbharat.com

६.०० शनिवार दि. २९ फेब्रुवारी २०२० बेळगाव • गोवा


डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

## कोरेगावात बारावी परीक्षेवेळी विद्यार्थ्याकडून मोबाईल जप्त

### व्हॉट्सअपवरुन प्रश्नपत्रिका पाठविल्याबद्दल गुन्हा दाखल

वार्ताहर

एकंबे

येथील डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये सुरु झालेल्या बारावी परिक्षेवेळी मोबाईल हँडसेटचा वापर करत असताना रिपिटर विद्यार्थी विशाल फाळके याला पर्यवेक्षिका पद्मा सचिन पलूसकर यांनी रंगेहाथ पकडले. याप्रकरणी कोरेगाव पोलीस ठाण्यात संबंधित विद्यार्थ्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस ठाण्यातून देण्यात आलेली अधिक माहिती अशी की, रयत शिक्षण संस्थेच्या कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये इयत्ता बारावीची परीक्षा सुरु आहे. शुक्रवारी गणित या विषयाचा पेपर होता. महाविद्यालयाच्या खोली क्र. १० मध्ये २९ विद्यार्थ्यांची आसन व्यवस्था करण्यात आली होती. या खोलीवर पर्यवेक्षिका म्हणून पद्मा पलूसकर यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्याबरोबरच सहपर्यवेक्षक म्हणून एस. एस. जाधव व आर. टी. ढोपे हे काम पाहत आहेत. तिघेजण मिळून विद्यार्थी–विद्यार्थीनींची अंगझडती घेऊन त्यांना खोलीमध्ये सोडत होते. या विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाटल्यानंतर चौथ्या रांगेतील शेवटच्या अलिकडील बाकावर बसलेला विद्यार्थी विशाल फाळके हा बराचवेळ शांतपणे बसला होता. त्याने उत्तरपत्रिकेवर काहीही लिहिले नव्हते. त्यानंतर काही वेळातच तो खाली पाहून घाईत प्रश्नपत्रिका सोडवत असल्याचे पर्यवेक्षिका पलूसकर यांच्या निदर्शनास आले. त्यांना फाळके याचे वर्तन संशयास्पद वाटले. त्यांनी परिक्षेच्या नियमानुसार फाळके याची तपासणी केली असता, फाळके हा डाव्या पायाच्या मांडीखाली मोबाईल लपवून ठेवला असल्याचे व तो चालू अवस्थेत असलेला दिसून आला.

**रिपिटर विद्यार्थी विशाल फाळके याला पर्यवेक्षिका पद्मा सचिन पलूसकर यांनी रंगेहाथ पकडले**

पलूसकर यांनी तातडीने फाळके याचा मोबाईल ताब्यात घेतला. सहपर्यवेक्षक आर. टी. ढोपे यांनी मोबाईल तपासला असता, त्याने दुसऱ्या व्हॉट्सअपवर दहा मिनिटांमध्ये प्रश्नपत्रिकेची तीन छायाचित्रे पाठविली होती. ढोपे व गणित विषयाचे शिक्षक सजगणे यांनी खात्री केली असता, ते प्रश्नपत्रिकेचे छायाचित्र असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर कस्टोडियन खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षिका पलूसकर यांनी फिर्याद दिली. याप्रकरणी कोरेगाव पोलीस ठाण्यात विशाल फाळके याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे अधिक तपास पोलीस नाईक सनी आवटे करत आहेत.